केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते जुलै, २०१९ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: इंगांवि -२०१९/प्र.क्र. ४८/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १७ मे, २०१९.

<u>वाचा :-</u>

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/ विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि. २८ मे, २०१२.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१९/प्र.क्र.१६/ अर्थसंकल्प, दिनांक १० एप्रिल, २०१९.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये २५,००,००,०००/- (रुपये पंचवीस कोटी फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रक व अर्थसंकल्प कार्यासनाचे संदर्भ क्रमांक ४ येथील ज्ञापनान्वये केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेसाठी एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी लेखानुदानाद्वारे मंजूर केलेली रक्कम रुपये ८,३३,३२,०००/- (रुपये आठ कोटी तेहतीस लक्ष बत्तीस हजार फक्त) वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण, (०८) (११) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना (केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), ५० इतर खर्च (२२३५ बी ०३१)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

६. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३७४/२०१९/व्यय १४, दिनांक १५.०५.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५१७१७०२१२८१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=759e87fbd1e68c290a7221620636ede8425d6a870aa0240f18d726b6c8e6b832, cn=Prashant Pundlik Wagh
Date: 2019.05.17 17:09:31 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद,
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी]
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ७, अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८. उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.इंगांवि-२०१९/प्र.क्र.४८/विसयो, दिनांक : १७ मे, २०१९ सोबतचे सहपत्र.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना (रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हा	नियंत्रक अधिकारी क्रमांक	इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना रु.२००/- द.म. लाभार्थी संख्या	एप्रिल, २०१९	मे, २०१९	जून, २०१९	जुलै, २०१९	या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई शहर	N००२८	०	०	०	०	०	०
२	मुंबईउपनगर	N००२९	०	०	०	०	०	०
३	ठाणे	N००३६	७३	२३४५४	२३४५४	२३४५४	२३४५४	९३८१६
४	रायगड	N००१२	१२६४	४०६१२१	४०६१२१	४०६१२१	४०६१२१	१६२४४८४
५	रत्नागिरी	N००२३	१२५१	४०१९४४	४०१९४४	४०१९४४	४०१९४४	१६०७७७६
६	सिंधुदूर्ग	N००१८	६५३	२०९८०७	२०९८०७	२०९८०७	२०९८०७	८३९२२८
७	पालघर	N००३७	७३९	२३७४३९	२३७४३९	२३७४३९	२३७४३९	९४९७५६
	कोंकण विभाग		३९८०	**१२७८७६५**	**१२७८७६५**	**१२७८७६५**	**१२७८७६५**	**५११५०६०**
८	नाशिक	N०००६	३७२०	११९५२३०	११९५२३०	११९५२३०	११९५२३०	४७८०९२०
९	धुळे	N००२६	२८४६	९१४४१५	९१४४१५	९१४४१५	९१४४१५	३६५७६६०
१०	जळगाव	N००१०	१०८९७	३५०११९०	३५०११९०	३५०११९०	३५०१२५४	१४००४८२४
११	अहमदनगर	N००३०	१५४३	४९५७६३	४९५७६३	४९५७६३	४९५७६३	१९८३०५२
१२	नंदुरबार	N००२७	५१६६	१६५९८२८	१६५९८२८	१६५९८२८	१६५९८२८	६६३९३१२
	नाशिक विभाग		**२४१७२**	**७७६६४२६**	**७७६६४२६**	**७७६६४२६**	**७७६६४९०**	**३१०६५७६८**
१३	पुणे	N००४०	७५७	२४३२२३	२४३२२३	२४३२२३	२४३२२३	९७२८९२
१४	सोलापूर	N००१९	१४४३	४६३६३३	४६३६३३	४६३६३३	४६३६३३	१८५४५३२
१५	सातारा	N००३२	११६९	३७५५९८	३७५५९८	३७५५९८	३७५५९८	१५०२३९२
१६	सांगली	N०००८	७५१	२४१२९५	२४१२९५	२४१२९५	२४१२९५	९६५१८०
१७	कोल्हापूर	N००३९	१५०४	४८३२३३	४८३२३३	४८३२३३	४८३२३३	१९३२९३२
	पुणे विभाग		**५६२४**	**१८०६९८२**	**१८०६९८२**	**१८०६९८२**	**१८०६९८२**	**७२२७९२८**
१८	नागपूर	N००१४	२५०७	८०५४९५	८०५४९५	८०५४९५	८०५४९५	३२२१९८०
१९	वर्धा	N००२५	९५९	३०८१२५	३०८१२५	३०८१२५	३०८१२५	१२३२५००
२०	चंद्रपूर	N००२१	५०१४	१६११०९९१	१६११०९९१	१६११०९९१	१६११०९९१	६४४३९६४
२१	भंडारा	N००३३	३७४०	१२०१६५६	१२०१६५६	१२०१६५६	१२०१६५६	४८०६६२४
२२	गडचिरोली	N००१३	२२२५	७१४८८९	७१४८८९	७१४८८९	७१४८८९	२८५९५५६
२३	गोंदिया	N००२४	३०८८	९९२१७०	९९२१७०	९९२१७०	९९२१७०	३९६८६८०
	नागपूर विभाग		**१७५३३**	**५६३३३२६**	**५६३३३२६**	**५६३३३२६**	**५६३३३२६**	**२२५३३३०४**
२४	अमरावती	N००११	१९२६	६१८८२१	६१८८२१	६१८८२१	६१८८२१	२४७५२८४
२५	अकोला	N००४१	४६६	१४९७२५	१४९७२५	१४९७२५	१४९७२५	५९८९००
२६	यवतमाळ	N०००७	१२८१	४११५८३	४११५८३	४११५८३	४११५८३	१६४६३३२
२७	बुलढाणा	N००३८	१८९९	६१०१४६	६१०१४६	६१०१४६	६१०१४६	२४४०५८४
२८	वाशिम	N००२२	४१०	१३१७३२	१३१७३२	१३१७३२	१३१७३२	५२६९२८
	अमरावती विभाग		**५९८२**	**१९२२००७**	**१९२२००७**	**१९२२००७**	**१९२२००७**	**७६८८०२८**
२९	औरगाबाद	N००३५	५७६	१८५०६७	१८५०६७	१८५०६७	१८५०६७	७४०२६८
३०	बीड	N००३४	६७२	२१५९१२	२१५९१२	२१५९१२	२१५९१२	८६३६४८
३१	नांदेड	N००३१	३०६	९८३१७	९८३१७	९८३१७	९८३१७	३९३२६८
३२	परभणी	N००१६	१०२३	३२८६८८	३२८६८८	३२८६८८	३२८६८८	१३१४७५२
३३	उस्मानाबाद	N००२०	११५१	३६९८१४	३६९८१४	३६९८१४	३६९८१४	१४७९२५६
३४	जालना	N००१५	९९४	३१९३७०	३१९३७०	३१९३७०	३१९३७०	१२७७४८०
३५	लातूर	N०००९	१८३९	५९०८६८	५९०८६८	५९०८६८	५९०८६८	२३६३४७२
३६	हिंगोली	N००१७	९८८	३१७४४२	३१७४४२	३१७४४२	३१७४४२	१२६९७६८
	औरंगाबाद विभाग		**७५४९**	**२४२५४७८**	**२४२५४७८**	**२४२५४७८**	**२४२५४७८**	**९७०१९१२**
	एकूण		६४८४०	**२०८३२९८४**	**२०८३२९८४**	**२०८३२९८४**	**२०८३३०४८**	**८३३३२०००**